**प्रेसनोट** दि. 29/03/2026

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून वनसर्व्हेक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे यांचे विरोधात लाचमागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरूष वय 48 वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | श्री.उदयसिंग भिमराव कुंभार वय 46 वनश्रेत्र सर्व्हेक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे रा.फ्लॅट नंबर 609, आय विंग, विंडसर कोटी, दत्तनगर, कात्रज, पुणे, मूळ पत्ताः-राजाची कुरोली, तालुका खटाव, जिल्हा सातारा, (वर्ग :- 2) |
| **सुरवातीची लाच मागणी** | 7,00,000/- (सात लाख रूपये) |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | 4,00,000/- (चार लाख रूपये) |
| **पडताळणी दिनांक** | दि. 13/03/2026 |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | 4,00,000/- (चार लाख रूपये) |
| **सापळा दिनांक** | दि. 29/03/2026 |
| **ठिकाण** | पुना प्रिव्हेंटिव्ह कार्डीयालॉजी सेंटर समोर व वाय के वडेवाले हॉटेल समोर सार्वजनिक रोडवर आरणेश्वर चौक,पुणे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. सतीश वाळके, सहा. पोलीस आयुक्त, लाप्रवि, पुणे (मो.क्र.8087002020) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9923444998) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांचा जमीन खरेदी- विक्रीचा व्यवसाय आहे. चिखलसेगाव, आपटी व कुणेणामा ता. वडगाव मावळ जि.पुणे या गावातील काही गटातील जमिनीच्या 7/12 वर लागलेले खाजगी वनाचे शेरे काढून टाकण्याबाबतच्या रिस्टोर्ड ऑर्डर्स महसूल विभागाकडून करण्यात येऊन त्या ऑर्डर्स वन विभागाच्या अभिलेखावर देण्यात आल्या होत्या. तक्रारदार यांना त्यांच्या व्यवसायाच्या अनुषंगाने वर नमूद गावातील 11 रिस्टोर्ड ऑर्डरच्या प्रतींची आवश्यकता असल्याने त्यांनी त्या 11 रिस्टोर्ड ऑर्डर मिळणेकामी दि. 13/02/2026 रोजी उपवनसंरक्षक, सेनापती बापट रोड, पुणे येथील वनविभागाच्या कार्यालयात अर्ज केला होता. सदर अर्जाचे अनुषंगाने तक्रारदार हे चौकशी कामी दि. 4/03/2026 रोजी उपवनसंरक्षक कार्यालयात गेले असता त्यांचे काम वनक्षेत्र सर्वेक्षक यातील आरोपी लोकसेवक उदय कुंभार यांचेकडे असल्याची माहीती त्यांना मिळाली त्याप्रमाणे तक्रारदार हे लोकसेवक उदयसिंग कुंभार यांना त्यांचे कार्यालयात भेटले असता लोकसेवक कुंभार यांनी तक्रारदाराकडून मागणी केलेल्या 11 रिस्टोर्ड ऑर्डर पैकी 7 ऑर्डर त्यांच्या रेकॉर्ड रूममध्ये उपलब्ध असल्याचे सांगून त्यासाठी 7 लाख रूपयाच्या लाचेची मागणी केले बाबत तक्रार तक्रारदार यांनी दि. 13/03/2026 रोजी ॲंटी करप्शन ब्युरो पुणे येथे दिली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दि. 13/03/2026 रोजी पडताळणी कारवाई केली असता लोकसेवक श्री कुंभार, वन सर्वेक्षक यांनी तक्रारदाराकडून मागणी केलेल्या 11 रिस्टोर्ड ऑर्डर पैकी 7 क्षेत्राच्या रिस्टोर्ड ऑर्डर त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सांगून त्या तक्रारदाराला देण्यासाठी तडजोडअंती तक्रारदाराकडे 4,00,000/- रूपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारदार यांचेकडे लोकसेवकाकडून लाच मागणी झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आज दि. 29/03/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आलोसे लोकसेवक उदयसिंग भिमराव वय 46 वनश्रेत्र सर्व्हेक्षक, उप वन संरक्षक कार्यालय, सेनापती बापट रोड पुणे यांनी स्वतः पुना प्रिव्हेंटिव्ह कार्डीयालॉजी सेंटर समोर व वाय के वडेवाले हॉटेल समोर सार्वजनिक रोडवर आरणेश्वर चौक, पुणे येथे 12:35 वाजता तक्रारदाराकडून रोख 4 लाख रूपयांची लाच स्वीकारली असता रंगेहात पकडण्यात आलेले आहे.

आरोपी लोकसेवक यांच्याविरूद्ध सहकारनगर पोलीस ठाणे, पुणे शहर पोलीस येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064

2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक -** 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)

3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in

4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in

5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.